# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## सार्वत्रिक निवडणूक २०१७

## हरकत/आक्षेपधारकांना जाहीर सुचना

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या २०१७ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचनेवर दिनांक ११.०७.२०१७ ते १९.०७.२०१७ पर्यंत हरकत/आक्षेप नोंदविले आहेत. अशा आक्षेपधारकांची सुनावणी दिनांक २८.०७.२०१७ रोजी राज्य निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण मुंबई हे घेणार आहेत. दाखल केलेल्या हरकत/आक्षेपधारकांना दिनांक २८.०७.२०१७ रोजी सकाळी १०.३० पासून स्थायी समिती सभागृह, पहिला मजला मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड येथे सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी नोटीसीद्वारे कळविलेले आहे.

तरी पुनश्च: एकदा या जाहीर सुचनेद्वारे दाखल केलेल्या हरकत/आक्षेपधारकांना कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक २८.०७.२०१७ रोजी त्यांना कळविलेल्या वेळेस वरील ठिकाणी सुनावणीकरीता उपस्थित रहावे.

स्वा/-

आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड